महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

| DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF) | DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 / | FAX- 020/25536761 E-MAIL - sscboardpune@gmail.com Website- www.sscboardpune.in |
|---|---|---|

जा.क पुविमं/माध्य शाखा क/181
पुणे–411005
दिनांक : 08/01/2026

प्रति,
मुख्यध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा ,
जिल्हा–पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

विषय : फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला प्रस्ताव सादर करण्यास **मुदतवाढ देणेबाबत.**

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक–२०१६/प्र.क्र.२०२/एसडी–२, दि.२४ नोव्हेंबर २०१७
२. राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/३९३१, दि. १७/११/२०२५ रोजीचे पत्र.
३. या कार्यालयाचे जा.क्र.पुविमं/माध्य.शाखा क/9466, दि. १२/१२/२०२५ रोजीचे परिपत्रक.
४. राज्यमंडळ कार्यालयाचे क्र.रा.मं/परीक्षा–७/४६१०, दि. २४/१२/२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा यांना कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णय १ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी–मार्च परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना शास्त्रीय कला, चित्रकला, लोककला वाढीव सवलतीचे गुण देण्यात येतात.

**शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६** या वर्षात माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) परीक्षेसाठी **चित्रकला, शास्त्रीय कला, लोककला चे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने स्विकारावयाचे आहेत.** त्यासाठी ऑनलाईन कलाप्रस्तावाबाबतची **link Art Praposals** ही संबंधित शाळांच्या **login** मध्ये **दिनांक** १७/११/२०२५ पासून उपलब्ध करून देण्यात आली आहे याची नोंद घेण्याबाबत संदर्भ क्रमांक ३ अन्वये कळविण्यात आले आहे.

संदर्भ क्रमांक १ शासन निर्णयातील मुद्या कमांक ५ मध्ये विद्यार्थ्यांनी चित्रकला, शास्त्रीय कला, लोककला चे प्रस्ताव माध्यमिक शाळेकडे **दिनांक १५ डिसेंबर अखेर** व सदरचे प्रस्ताव **माध्यमिक शाळांनी विभागीय मंडळाकडे सादर करण्याची तारीख १५ जानेवारी** अशी नमूद केली आहे.

संदर्भ क्रमांक ४ वरील राज्यमंडळ, पुणे यांच्या आदेशानुसार सदरचा प्रस्ताव सादर करण्याच्या तारखांना मुदतवाढ देण्यात आली आहे. तरी सदरची मुदतवाढ खालील तक्ता 'अ' नुसार

| अ.क्र. | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारित अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | विद्यार्थ्यांनी शाळेकडे प्रस्ताव सादर करणे. | **दिनांक १५ डिसेंबर** | शनिवार, दिनांक २४ जानेवारी २०२६ |
| २. | शाळांनी विभागीय मंडळाकडे प्रस्ताव सादर करणे. | **दिनांक १५ जानेवारी** | शनिवार, दिनांक ३१ जानेवारी २०२६ |

तरी उपरोक्त तक्ता 'अ' नुसार सर्व शाळांनी **दिनांक २४ जानेवारी २०२६ रोजी पर्यंत विद्यार्थ्यांकडून प्रस्ताव स्विकारून** बैठक क्रमांक निहाय प्रस्ताव **दिनांक ३१ जानेवारी २०२६ पर्यंत मंडळात ऑनलाईन सादर करण्यात यावे.** विहीत मुदतीनंतर प्रस्ताव स्विकारले जाणार नाही. तसेच कोणताही विद्यार्थी सदर गुणाच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही याची नोंद घ्यावी.

MBRaut 8.1.26
(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव,(प्र)
पुणे विभागीय मंडळ, पुणे.

प्रत माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीसाठी –
1. विभागीय शिक्षण उपसंचालक
2. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

MSBSHS-11015/108/2025-EXM

I/1633812/2025

Maharashtra State Board of Secondary & Higher Secondary Education S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Near Balchitrawani, Behind Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar, Pune-411004.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, स.न.८३२ ए, फा.प्लॉ.नं.१७८, १७९, बालचित्रवाणी शेजारी, आघारकर रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 । EPABX -25705000 ।
Email : secretary.stateboard@gmail.com

महत्त्वाचे/तातडीचे /परीक्षा प्राधान्य

क्र.रा.मं./परीक्षा-७/४६७०
पुणे ४११ ००४.
दिनांक- २४/१२/२०२५

**प्रति,**

**विभागीय सचिव,**
**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,**
**सर्व विभागीय मंडळे.**

**विषय**:- फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेस प्रविष्ट विद्यार्थ्यांच्या शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ**:- १. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय संकीर्ण–२०१६/प्र.क्र.२०२/एस.डी.२, दि.२४/११/२०१७.
२. महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांचे पत्र क्र.कशिमं/शारेप/सहा/२०२५/१३०० दि.०४ डिसेंबर २०२५.
३. अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघ, जळगांव, ता.जि.जळगांव.यांचे पत्र दि.०८/१२/२०२५.

उपरोक्त संदर्भिय विषयांस अनुसरून कळविण्यात येते की, संदर्भिय क्र. १ च्या शासन निर्णयानुसार शास्त्रीय कला, चित्रकला क्षेत्रात प्राविण्य मिळविणाऱ्या व लोककला प्रकारामध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना सवलतीचे अतिरिक्त गुण देण्याबाबतची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येते. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ५ मध्ये याबाबतचे प्रस्ताव विद्यार्थ्यांनी माध्यमिक शाळेकडे दि.१५ डिसेंबर अखेर व माध्यमिक शाळांनी संबंधित विभागीय मंडळाकडे सदरचे प्रस्ताव सादर करावयाची अंतिम तारीख १५ जानेवारी अशी नमूद आहे.

तथापि, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई यांनी संदर्भिय क्र. २ च्या पत्रान्वये कळविल्यानुसार शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिडीएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा २०२५ चा निकाल जानेवारी २०२६ च्या शेवटच्या आठवडयात जाहीर करण्यात येणार असल्याने शास्त्रीय कला, चित्रकला व लोककला प्रस्ताव शाळांनी विभागीय मंडळांकडे सादर करण्यासाठी खालीलप्रमाणे मुदतवाढ या वर्षापूरतीच देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तपशील | शासन निर्णयानुसार अंतिम दिनांक | वाढीव मुदतीसह सुधारीत अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १. | शाळांनी विभागीय मंडळांकडे प्रस्ताव सादर करणे | दि. १५ जानेवारी २०२६ | दि. ३१ जानेवारी २०२६ |

तरी उपरोक्तनुसार सर्व विभागीय मंडळांनी योग्य ती कार्यवाही करावी. सदर मुदतवाढ आपल्या कार्यकक्षेतील सर्व माध्यमिक शाळांच्या निदर्शनास आणून देवून त्याप्रमाणे मुदतीत कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे. तसेच आपल्या स्तरावरून याबाबत प्रसिध्दी देण्यात यावी व कोणताही पात्र विद्यार्थी सदर गुणांच्या सवलतीपासून वंचित राहणार नाही, याची संबंधितांनी दक्षता घ्यावी.

Digitally signed by
Dipak Ambadas Mali
Date: 30-12-2025
15[illegible]:26
सचिव
राज्यमंडळ, पुणे — ०४.

**<u>प्रत माहितीस्तव सादर</u>,**

१. मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ३२.
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे — ०१.
३. मा. संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे — ३०.
४. मा. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई —०१.
५. मा. संचालक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई — ०१.

**<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी</u>** —

१. अखिल महाराष्ट्र राज्य शैक्षणिक कलाशिक्षक संघ, जळगांव, ता. जि. जळगांव
२. व्यवस्थापक, गणकयंत्र विभाग, राज्यमंडळ, पुणे.